MHSO100005172020

## <u>वि.दि.दा.क्र.१०८/२०२० मधील नि.क्र.९२ खालील आदेश</u>.

वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम–६ नियम–१७ प्रमाणे मुळ दाव्यात दुरुस्तीसाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. त्याने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, सदरच्या दाव्यातील प्रतिवादी क्र.३ हिला दाव्याचे समन्स गेले होते परंतु तिच्या नावात बदल असल्याचा बेलीफ यांचा अहवाल आला आहे. प्रतिवादी क्र.३ हिचे नाव सौ.लता संतोष मदे असे लिहिले होते. सदरचे बेलीफ अहवालाप्रमाणे प्रतिवादी क्र.३ चे नाव लता संग्राम मदे असे आहे. त्यामुळे दाव्याचे सरनाम्यामध्ये प्रतिवादी क्र.३ चे नावामध्ये लता संतोष मंदे ऐवजी 'लता संग्राम मंदे' अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती ही टंकलेखनातील चुक झालेली असल्यामुळे करावी लागत आहे. सदरच्या नियोजीत दुरुस्तीमुळे मूळ दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. म्हणून शेवटी वादीने सदरची नियोजित दुरुस्ती मुळ दाव्यामध्ये करण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे.

२. सदरच्या अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यांनी वादींच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्यांनी पुढे कथन केले आहे की, सदरचा अर्ज मुदतीत व कायदेशीर नाही. म्हणुन शेवटी त्यांनी सदरचा अर्ज खर्चासह रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. वर नमुद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयांवर मी माझे कारणांसह खालील निष्कर्ष नोंदवित आहे.

**निशाणी क्र.९२ खालील आदेश.**

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | सदरची नियोजित दुरुस्ती मंजूर करणे आवश्यक आहे काय ? | .... | होय. |
| २. | आदेश काय ? | ... | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u>**

४. मी वादीतर्फे विद्वान वकील श्री.कुलकर्णी व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.वाघमोडे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरचे मुळ दाव्यातील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.३ ला जे समन्स पाठविले होते त्याच्या बेलीफांच्या अहवालावरुन दिसून येते की, तिच्या पतीचे नाव संतोष असे नसून संग्राम असे आहे. सदरच्या नावात चुक असल्यामुळे तिने सदरचे समन्स स्विकारले नाही. सदरच्या प्रकरणातील प्रतिवादी क्र.३ चे नाव टंकलेखनाच्या चुकीमुळे लता संग्राम मंदे ऐवजी लता संतोष मंदे असे लिहिण्यात आल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.३ चे नावात टंकलेखनामुळे चुक झाल्याचे दिसुन येते. वादीला प्रतिवादी क्र.३ च्या पतीचे नाव संतोष ऐवजी संग्राम असे सरनाम्यात दुरुस्त करावयाचे आहे. सदरच्या नियोजित दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. म्हणून न्यायाचे हितार्थ वादीने विनंती केल्याप्रमाणे नियोजित दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. वर नमुद केलेल्या कारणांचा विचार करुन मी या निष्कर्षापर्यंत आलेलो आहे की, सदरची नियोजित दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

५. मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी दिल्यामुळे मुद्दा क्र. २ च्या उत्तरासाठी

**निशाणी क्र.९२ खालील आदेश.**

खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा नि.क्र.९२ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने सदरची नियोजित दुरुस्ती १४ दिवसाच्या आत मुळ दाव्यामध्ये करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.04.17 19:08:13 +0530

दि.१७.०४.२०२६. (सो.द.घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस.

**निशाणी क्र.९२ खालील आदेश.**

शेरा

मी शपथेवर सांगते की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री. म. पां. सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.१७.०४.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.१७.०४.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.१७.०४.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.१७.०४.२०२६.

स्वाक्षरित/-

(श्री. म. पां. सदाफुले )

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.